REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# महात्मा ज्योतिराव फुलेंचे समाजक्रांती विचार



**प्रा. डॉ. डि. एस. आठवले**
**सहा. प्राध्यापाक, राज्यशास्त्र विभाग ,**
**श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महा., दर्यापूर.**

**प्रस्तावना :-**

अस्पृश्य, सामान्य जनता, अदर्शनिय, अनाभिगम्य्य, जातिभेद, जातिव्यवस्था, शेतकरी, कामगार, स्त्री शिक्षण, अतिशुद्रांच्या दुःखाला वाचा फोडणारा आणि सत्यमेव जयते ह्या दिव्यत्वाने भारावलेल्या व भगवान गौतम बुद्ध, संत कबीर यांच्यानंतर तिसरे गुरू डॉ. बाबासाहेब यांनी महात्मा फुलेंना मानलेल्या या महापुरुषाने समाजक्रांतीची मशाल सर्वप्रथम भारतभर तेवत ठेवण्याचे महान, अद्वितीय, अतुलनीय कार्य केले.

आपल्या ब्राह्मण स्नेहींच्या आग्रहाखातर त्यांच्या लग्नप्रसंगी उपस्थित असतांनाचा प्रसंग फुले सांगतात की, लग्नात ते ब्राह्मण लोकांच्या सोबत बरोबरीने चालत असतांना काही ब्राह्मणांच्या कपाळात ती चीड निर्माण होऊन त्यापैकी एक व्यक्ती महात्मा फुलेंना म्हणतो की, 'ब्राह्मणासंगे रस्त्यातून चालतांना तुला धारिष्ट्य तरी कसं झाल? अरे शुद्रा, तु जातिपातीची सगळी बंधनं आणि रितीरिवाज धुडकावून आमचा असा अपमान करतोस काय? तु आमच्या बरोबरीचा आहेत असे समजतोस काय? असं वागण्यापूर्वी तू शंभर वेळा विचार करायला पाहिजे होतास, चल हट मागे अन चालू लाग सर्वांच्या मागून. अलिकडं लोक अगदी बेताल अन् बेशरम झाले आहेत. जातिपातीची मर्यादा ध्यानातच ठेविनासे झाले आहेत. ह्या इंग्रज राजवटीमुळे हे लोक भारीच उद्धट होत चालले आहेत.'

ही त्या ब्राह्मणांची भाषा ऐकून फुले क्षणभर गोंधळून गेले, अवाक् झाले. त्यांच्या शरीराच्या रोमारोमात, मेंदूतल्या कप्पा-कप्प्यात आणि रक्ताच्या थेंबाथेंबात अपमान चालू लागला. ते अपमानकारक शब्द त्यांच्या जिव्हारी झोंबले व त्यांचा त्या प्रसंगावरून स्वाभिमान जागृत झाला.

सामाजिक अप्रतिष्ठेचा तो कलंक ज्योतिच्या पुढीला आयुष्याची वाटचाल करण्यास कारणीभूत ठरला. ज्योतिबा म्हणतात की, 'मी सुशिक्षित आहे, चांगले वाईट मला समजते. ब्राह्मण व मी एकाच धर्माचे मगे ही दर्जाच्या संबंधात असमानता का? म्हणून ते म्हणत की, जातिभेद हा एकोप्याचा, संपूर्ण जीवनाचा शत्रू आहे.

१८७३ मध्ये महात्मा ज्योतिबा फुलेंचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ ब्राह्मणांकडून शुद्र, अतिशुद्रांची कशी फसवणूक होते. त्यांना कशा प्रकारची अमानवीय वागणूक मिळते हे सांगण्याच्या उद्देशानेच हा ग्रंथ लिहिलो आहे.

शुद्र हे मुळचे क्षत्रिय होत हा सिद्धांत त्यांनी त्यामध्ये मांडला नंतर हाच सिद्धांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शुद्र पूर्वी कोण होते? या आपल्या ग्रंथात मांडला. १८६३ मध्ये अमेरिकेत अब्राहम लिंकनने गुलामगिरी नष्ट केल्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ म. फुले हा ग्रंथ आपल्या शुद्रबांधवास ब्राह्मणलोकांच्या हास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात वळवितील अशी बाळगतो.

ज्योतिरावंनी या ग्रंथात एकूण दोन जाहीरनामे प्रसिद्ध केलेत. या ग्रंथाद्वारे ज्योतिरावांना कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता, जातिविषयक भावना जागृत करून ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून त्यांची मुक्तता व्हावी हाच उद्देश होता. शुद्र हे ब्राह्मणांचे दास आहेत, असा उल्लेख ज्या-ज्या ग्रंथात, संहितेत आणि शास्त्रात आहे, त्या सर्व ग्रंथाचा नि शास्त्रांचा महात्मा फुलेंनी सर्वप्रथम धिक्कार केला. वेद हा भेद आहे व अशी भेदभावाची भाषा ज्या ग्रंथात मांडली नसेल व तो ग्रंथ आपल्याच देशातील सोडा, परंतु पाश्चात्य देशातील पुरुषाने लिहिला असेल तर मी त्याला धाकटा भाऊ समजेल.

गुलामगिरी ह्या ग्रंथाच्या सुरूवातीलाच म. फुले म्हणतात की, ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो त्या दिवशी त्याचा अर्धा सद्गुण जातो. ह्या होमरच्या सुप्रसिद्ध वचनाने झाला आहे. पुढे असे सांगतात की, ब्राह्मण हे पूर्वी भारतावर, हिंदुस्थानावर स्वारी करण्यापूर्वी डोंगराळ प्रदेशातील रहिवाशी होते. या ब्राह्मणांनी भारतातील शुद्र पूर्वीचे क्षत्रिय यांच्याशी लढाई करून त्यांना पराभूत केले. क्षत्रिय फार शूर होते परंतु ब्राह्मणांच्या पुढे टिकाव लागू शकला नाही. क्षत्रियांचा पराभव झाला. ब्राह्मणांनी आपला राज्यकारभार धर्मशास्त्राचा आधार घेऊन अनेक

धर्मशास्त्राची निर्मिती केली. त्यात शुद्रांनी धर्मग्रंथ वाचू नये, संपत्ती संग्रहीत करू नये, धंदे व व्यवसाय करू नये, या आपल्या धर्मशास्त्रात अनेक अमानविय बाबी टाकल्या होत्या.

ज्योतीराव पुढे म्हणतात की, 'ब्राह्मणी धर्मशास्त्रात ब्राह्मणांनी कोणतेही दुष्कृत्य केल्यास त्यास त्यांना शिक्षा नव्हती. एखाद्या ब्राह्मणाने कुत्रा, मांजर, पक्षी, घुबड, कावळा आणि शुद्र याला ठार मारले तर थोडावेळ पश्चाताप, उपोषण जरी केले तरी तो त्या पापापासून त्यांना मुक्ती मिळत असे. पशु, पक्षी, प्राणी व शुद्रमानव यांस या धर्मशास्त्रात समान संबोधले होते. परंतु ब्राह्मणहत्या हा सर्वाधिक भयंकर गुन्हा समजल्या जायचा.

ब्राह्मण भुदेव आहे, तो सर्व जगाचा निर्माता आहे, देव आणि त्यांचे स्थान बरोबरीचे आहे. त्याची सेवा, पुजा आपण सर्वांनी केली पाहिजे, ब्राह्मणाला सर्व पापातून मुक्ती आहे, तो कोणतेही अपकृत्य करीत नाही, त्याला वाचवण्यासाठी खोटे बोलण्याची वेळ आली तरी तो खुशाल खोटे बोलले पाहिजे, त्याच्या वस्तुची कोणी चोरी करू नये. त्याच्या उजव्या पायामध्ये सर्व तिर्थ आहेत, कनिष्ठ वर्गातील कोणत्याही मनुष्यास तो गुलाम, दास म्हणून राबविण्यास तो पात्र आहे कारण या गुलामांची निर्मितीच मुळात ब्राह्मणांची सेवा करण्यासाठीच झाला आहे. ब्राह्मणाने त्याची गुलामगिरीतून मुक्तता केली तरी तो त्यातुन मुक्त होऊ शकणार नाही.

शुद्र आपल्या गुणांनी, कलाकसुरींनी वयाने श्रेष्ठ असला तरी त्याने संपत्ती संग्रहीत करू नये, एखाद्या शुद्राने ब्राह्मण स्त्रीशी व्यभिचार केला तर त्याला देहांताची शिक्षा की जायची परंतु एखाद्या ब्राह्मणाने शुद्र स्त्रीशी व्यभिचार केला तर शिक्षा नसे.

अशा प्रकारच्या अनेक दंतकथा समाजाला विध्वंसक ठरतील, समाज विभाजीत होतील, जातिव्यवस्था कठोर होईल अशी निरर्थक समजूत, खोटी लिखाणे ब्राह्मणांनीी समाजात रूजविली. म्हणून ज्योतीराव म्हणतात की, जातिभेदाचे मुळ कारणा ब्राह्मणांच्या स्वार्थी धर्मांधतेत आणि अहंकारात आहे. अशा या दडपणाखाली व दृष्टकृत्याखाली भारतातील जनता हजारो वर्षापासून पिंजून निघत आहेत. अशा या रयतेच्या कल्याणाकरिता त्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याचे व्रत म. फुलेंनी उचलले होते.

ज्योतीराव म्हणतात की, ब्राह्मणांनी शुद्रांचा अतिव छळ केला म्हणून त्यांना ते बांधवा आहेत असे म्हणावयास लाज वाटते. मनुस्मृतीचा ज्योतीराव धिक्कार करतात कारण त्यात शुद्रांच्या माथी गुलामगिरी बसवली. ब्राह्मणांनी प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी दारू व गोमांस खाणे सोडले व बुद्धधर्मियांचा छळ करून त्यांचा निःपात केला असे ते म्हणतात.

सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्याद्वारे ज्योतीरावांनी जनसेवेचे अविरतपणे कामे केली.

सामाजिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर भारताची सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचे अध्ययन करतांना भारतात फार पूर्वीपासून सामजिक विषमता मोठ्या प्रमाणात वास्तव्यात होती, हे सिद्ध होते. भारताच्या आर्यकालीन संस्कृतीपासून तर आजतागायत सामाजिक विषमतेचे चटके काही वर्गाच्या लोकांना सहन करावे लागतात, हे कटु सत्य आहे.

आर्यांच्या आगमनानंतर भारतातील मूलनिवासी यांच्यात युद्ध होऊन युद्धात पराजीत झालेल्यांवर अनिर्बंध असे अत्याचार करण्यात येऊन ज्यांनी आर्यांची संस्कृती झिडकारली किंवा त्यांना विरोध केला त्या मूलनिवासींना दस्यू किंवा दास या नावाने संबोधल्या गेले आणि हेच सामाजिक विषमतेचे पहिले रुप होते असे म्हणावे लागेल. आर्यांच्याच काळात वर्णव्यवस्था निर्माण केल्या गेली व चार वर्णाची निर्मिती आर्यांनी आपल्या सोयीकरिता केल्याचे दिसते.

भारताची सामाजिक व धार्मिक स्थितीची बोचणारी माहिती वेदांमध्ये जी दिसून येते. तेवढी माहिती इतर कोणत्याही वाङ्मयातून आपल्याला दिसून येत नाही. वेदाप्रमाणेच संहितेमध्येसुद्धा चातुवर्ण्यपद्धतीचा व वर्णव्यवस्थेचा स्पष्ट उल्लेख पुरुषसुक्तातील काही ऋचांमध्ये दिसून येतो. हिंदू समाजव्यवस्थेचा जनक मानल्या गेलेल्या मनुने पुरुषसुक्तात चातुवर्ण्यपद्धतीचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रयत्न पुरेपूर केला व ती पद्धती ईश्वराच्या इच्छेनुसारच आहे, हे समाजमनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

ब्राह्मणयुगात तर वरील सामाजिक विषमतेचे रुप, चातुवर्ण्यपद्धती व वर्णव्यवस्थेला अधिक घट्ट स्वरुप देण्याचा प्रयत्न केला गेला. जन्मावर आधारित वर्ण निश्चित केल्या जाऊन ज्याचा जन्म ज्या वर्णात झाला असेल त्याला मरेपर्यंत त्याच वर्णात राहावे लागून त्याच वर्णाची कामे करावी लागत. कर्मावरून वर्णपद्धतीत कोणताच बदल केला जात नसे. याच काळात त्रैवर्णिकांच्या जबाबदाऱ्या व कार्य, अधिकारा इत्यादीबाबत नियमबद्धता केल्या गेली व त्यानुसारच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या वर्णांच्या लोकांना आपआपली जबाबदारी, कार्य व अधिकार पार पाडावे लागे.

सिंध संस्कृतीत मात्र समाज हा व्यावसायिक पायावर विभागलेला दिसून येतो. बौद्ध धर्माच्या उदयाच्या वेळी प्राचीन भारताची सामाजिक व राजकीय जीवनावर अहिंसक मार्गाने परिणाम केला गेला. बौद्ध धर्माचा उदयच मुळात भारतात सुरू असलेल्या अनिष्ट सामाजिक परंपरा, यज्ञीय कर्मकांड, वैदिक वाङ्मयाची अनिष्ट परंपरा, सामाजिक अंधश्रद्धा इत्यादी सर्व कारणांमुळे झालेला असल्यामुळे सामाजिक विषमतेला पहिले खिंडार पाडण्याचा प्रयत्न बौ धर्माच्या उदयामुळे झाल्याचे दिसून येते.

त्यानंतरच्या पुढच्या मौर्यकाळ, गुप्तकाळात परिस्थिती साधारण (चातुवर्ण्यपद्धती) सारखीच असल्याचे दिसते. आक्रमक आर्यांनी मूलनिवासी भारतीयांना युद्धात पराजित करून त्यांना दास बनविले. त्यांनी त्रैवर्णिकीची सेवा करावी, असा नियम बनविला गेला. शुद्राला अत्यंत कनिष्ठ समजले जाऊन उचनिचतेची दरी निर्माण केली. जातीच्या जन्माच्या आधारावर जाती ठरविल्या गेल्या. आंतरजातीय विवाह, रोटी-बेटी व्यवहारावर कडक निर्बंध लादल्या गेले. अस्पृश्यांना जनावरे फाडणे, रस्ते झाडणे, कातड्यापासून पादत्राणे तयार करणे व मैला साफ

करणे इत्यादी कामे त्यांना करावी लागत असत. हिंदू समाजातील धर्मतत्वो यांनी शुद्राची परिभाषा मांडतांना म्हटले आहे की, शुद्राला सेवेचा अधिकार असतो व तो जन्मतःच कनिष्ठ व निच असतो. याचाच पगडा एवढा शुद्रांवर लादल्या गेला की, जे आपल्या वाट्याला पूर्वापारा चालत आलेले आहे, त्याचा बिनदिक्कतपणे शुद्र हे स्विकार करीत होते.

अस्पृश्यांना वेदाचा अभ्यास करणे, यज्ञ पूजा-पाठ, मंदिर प्रवेश यावर बंदी होती. ब्रिटिशांपूर्वी भारतात असलेल्या कोणत्याही शासनकर्त्या जमातीने उच्च-निच, श्रेष्ठ-कनिष्ठ व अस्पृश्यता नाहीशी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.

अस्पृश्यता हा हिंदू धर्माचा सर्वात मोठा कलंक राहिला आहे. अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या विकृतीचे द्योतक राहीले आहे. अस्पृश्यता, जातिभेद व उच्च-निचता भारतात कमी करण्याचा प्रयत्न अनेक समाजसुधारकांनी केल्याचे दिसते. त्यामध्ये पूर्व महावीर स्वामी, गौतम बुद्ध, राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी.

अस्पृश्यांची व महिलांची अत्यंत दयनीय अवस्था पेशवाईच्या काळात मोठ्या प्रमाणात झाली हे दिसून येते. नग्न महिलांची धिंड काढणे, ब्राह्मणांना सर्वोच्च पदे प्रदान करणे, शुद्रांना हिनतेची कामे निर्बंधपूर्वक करवून घेणे. जन्माच्या आधारावरा त्याची त्या-त्या वर्गात विभाजन करण्याच्या प्रवृत्तीला पेशवाईने खतपाणीा घातल्याचे दिसून येते. ब्राह्मणांनी गुन्हा केल्यास त्यास कोणत्याही प्रकारची शिक्षा केल्या जात नसे तर शुद्राने लहानात लहान गुन्हा केल्यास त्यास मोठ्यात मोठी शिक्षा होत असे. ब्राह्मणांच्या हातात सत्तासुत्रे असल्यामुळे ते कनिष्ठ वर्गाच्या लोकांना कमी समजत असत.

अस्पृश्य समाजाला आपला उदरनिर्वाह चालविण्याकरिता पूर्णपणे स्पृश्य वर्गावर अवलंबून राहावे लगत असे. आपल्या कामाचा मोबदला त्यांना कधी अन्नधान्याच्या स्वरुपात तर कधी त्यांना वस्तुंच्या स्वरुपात दिला जात असे. याव्यतिरिक्त अस्पृश्यांना काही विशिष्ट बाबी करण्यास पूर्णपणे निर्बंधपूर्वक होते. उदा. जमिनी घेऊ नये, घर बांधू नये, स्वच्छ कपडे, बुट घालू नये, आपल्या मुलांची नावे श्रेष्ठसूचक ठेऊ नये, घोड्यावर बसू नये, हिंदूंना अभिवादन करू नये, संस्कृत भाषा बोलू नये, हिंदूंच्या उपस्थितीत खुर्चीवर बसू नये इत्यादी.

अस्पृश्यतेविषयी डॉ. आंबेडकरांचे संशोधन अतिशय मौलिक व अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, अस्पृश्यतेला वांशिक अथवा व्यावसायिक पाया नाही. त्यांच्या मते, हिंदूमधील पतनाचे मूळ कारण जर कोणते असेल तर ते म्हणजे जातिव्यवस्था होय.

## निष्कर्ष :-

ह्या सर्व बाबींच्या अध्ययनानंतर बऱ्याच बाबी स्पष्ट होतात की, भारतात फार पूर्वीच्या काळापासूनच सामाजिक विषमतेच्या बाबी दृढमूल झाल्या होत्या. जाती, जातीभेद, चातुवर्ण्यपद्धती, वर्णव्यवस्था, वर्गव्यवस्था, जाती व पोटजातींचा उदय ह्या सर्व बाबी एका विशिष्ट वर्गाने आपल्या स्वार्थासाठी काही वर्गावर जाणीवपूर्वक लादल्याचे दिसून येते. त्यास त्यांनी ईश्वर व परमेश्वराच्या आज्ञेचे बलस्थान लावल्यामुळे शुद्रांच्या त्या बाबी अंगवळणी पडल्या होत्या.

आजही ह्या सर्व बाबींची पाळेमुळे एवढी पक्की झाली आहेत की, पुर्वीसारखी अस्पृश्यता जरी आज कायद्याच्या भितीपोटी म्हणा की इतर कोणत्याही कारणाने म्हणा ती आजही दुसऱ्या पद्धतीने भारतात पाळजी जाते ही खूप मोठी शोकांतिका आहे.

## संदर्भसूची :-


१. Fisher, F. B., Touching the Untouchables, Ideas Silent Revolution, The Collier Mamillan Limited, London, १९६७.
२. Kakade, S. R., Sheduled Caste and National Integration a Study of Marathwada, Livbaration Movement.
३. अग्रवाल, आर. सी., भारतीय संविधान का विकास तथा राष्ट्रीय आंदोलन क इतिहास और भारतीय संविधान, एस. चंद एण्ड कंपनी, लि. नई दिल्ली, १९९८.
४. बगाडे, उमेश, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजाती प्रभुत्व, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६.
५. निकम, श्रीराम, गांधी-आंबेडकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई.